## संक्षिप्त

### 'सहकार शिरोमणी', 'विठ्ठल'चे वजनकाटे निर्दोष

सोलापूर (प्रतिनिधी) : पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथील श्री विठ्ठल आणि भाळवणी येथील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्यांवरील वजनकाटे निर्दोष असल्याचे तपासणीत स्पष्ट झाले. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार शासनाने नियुक्त केलेल्या भरारी पथकाच्या सदस्यांनी ही तपासणी केली असल्याचे विठ्ठल कारखान्याचे कार्यकारी संचालक आर. डी. पाटील आणि ''सहकार शिरोमणी''चे कार्यकारी संचालक जगदीश हरळीकर यांनी सांगितले. श्री विठ्ठल आणि सहकार शिरोमणी वसंतराव काळे कारखान्यावर नुकतीच भरारी पथकाने अचानक जाऊन तेथील वजनकाट्यांची तसेच ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाड्या, ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टर यांची तपासणी केली. दोन्ही कारखान्यांवरील वजनकाटे निर्दोष असल्याचे तपासणीत स्पष्ट झाले. तसा लेखी अहवाल भरारी पथकातील अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

# अॅग्रोवन कृषी प्रदर्शनाचा उत्साहात समारोप

सांगली (प्रतिनिधी) : गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या नेचर केअर फर्टिलायझर्स प्रस्तुत 'अॅग्रोवन' कृषी प्रदर्शनाचा रविवारी (ता. ७) उत्साहात समारोप झाला. मे. बी. जी. चितळे आणि चितळे जिनस एबीएस इंडिया प्रदर्शनाचे सहप्रायोजक होते. प्रदर्शनात सुटीचे औचित्य साधून शेतकऱ्यांबरोबर शेतीक्षेत्रात नवीन काही तरी करण्याची इच्छा असलेल्या नागरिकांनी प्रदर्शनाचा लाभ घेऊन स्टॉलधारकांकडून शेतीचे बारकावे जाणून घेतले.

रविवारी प्रदर्शनाचा शेवटचा दिवस असल्याने व सुटीचा दिवस असल्याने अनेक शेतकऱ्यांनी कुटुंबातील सदस्यांसहित प्रदर्शन पाहण्यास पसंती दाखवली. शुक्रवारी (ता. ५) प्रदर्शनाचे उद्‍घाटन झाल्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा ओघ नेमिनाथनगर येथील प्रदर्शनस्थळी सुरू झाला. शेतकऱ्यांबरोबर परिसरातील कृषी मंडळे, कृषी महाविद्यालयांचे विद्यार्थी याबरोबरच अनेक संस्था, संघटना, कारखाने आदींच्या प्रतिनिधींनीही प्रदर्शनास भेट देऊन नवे तंत्रज्ञान अवगत करून घेतले. प्रदर्शनाची सांगता होईपर्यंत गर्दी कायम राहिली.

प्रदर्शनाच्या माध्यमातून ठिबक, पॉलिहाउस, शेततळे, पशुधनासंदर्भातील आधुनिक प्रयत्न, वेगवेगळ्या औषधांची माहिती आपल्याला एकाच ठिकाणी मिळाल्याच्या प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी नोंदविल्या. याबरोबर नावीन्यपूर्ण अवजाराबाबतही माहिती घेतली. अनेकांनी संपर्क क्रमांक घेऊन भविष्यातील संवाद दृढ करण्याचा प्रयत्न केला.



सांगली : अॅग्रोवन कृषी प्रदर्शनाचा समारोप रविवारी (ता. ७) झाला. शेवटच्या दिवशी प्रदर्शनाला मोठी गर्दी झाली होती. (छायाचित्र : उल्हास देवळेकर)

### जमीन सुपीकतेचा 'अॅग्रोवन'चा संकल्प

पीकवाढीसाठी जमिनीची सुपीकता ही खूप महत्त्वाची ठरते. यंदा 'अॅग्रोवन'ने जमिनीच्या सुपीकतेवरच जास्तीत जास्त जागृती करण्याचा संकल्प केला आहे. याअंतर्गत या प्रदर्शनातही जमिनीच्या सुपीकतेवर अनेक तज्ज्ञांनी आपले मत मांडले. याला शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

### व्याख्यानांना प्रतिसाद

**प्रदर्शनात आयोजित अॅग्रोसंवाद या शेतीविषयक व्याख्यानाला शेतकऱ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. विशेषकरून ऊस व द्राक्षविषयक व्याख्यानांना शेतकऱ्यांनी उच्चांकी गर्दी करून व्याख्यात्या तज्ज्ञांकडून किफायतशीर शेतीची सूत्रे जाणून घेतली. याचबरोबर डाळिंब शेतीतील विविध योजना, पशुव्यवस्थापनातील बारकावे याबाबत तज्ज्ञांनी दिलेली माहिती शेतकऱ्यांना उपयुक्त ठरली. अनेक शेतकऱ्यांनी व्याख्यात्यांना शेताची पाहणी करण्याचे निमंत्रण देऊन संवादाचा पूल बळकट केला.**

# जमिनीला काय हवंय ते तपासून घेणे गरजेचे

## एन. बी. म्हेत्रे : द्राक्षबागेसाठी जमिनीच्या व्यवस्थापनासंदर्भात चर्चासत्र

**सांगली (प्रतिनिधी) :** द्राक्षवेलीला, जमिनीला विचारा तुला काय पाहिजे. द्राक्षउत्पादक शेतकऱ्यांनी जमिनीचा सामू, पोत, सौररचना यासह लागणाऱ्या भौतिक, जैविक रासायनिक खतांचा आढावा घेतला पाहिजे. तरच उद्याच्या काळात दर्जेदार द्राक्षांचे उत्पादन होईल. प्रत्येक पिकासाठी कशी जमीन लागते, याचा नितांत विचार करणे गरचेचे आहे, असे मत द्राक्षतज्ज्ञ एन. बी. म्हेत्रे यांनी व्यक्त केले.

सांगली येथे अॅग्रोवन प्रदर्शनाच्या शेवटच्या दिवशी रविवारी (ता. ७) द्राक्ष बागेसाठी जमिनीचे व्यवस्थापन या विषयावर ते बोलत होते. एन. बी. म्हेत्रे म्हणाले, ''द्राक्षशेतीमध्ये बदलत्या हवामानामुळे द्राक्षाचे उत्पादन दर्जेदार येत नाहीत. द्राक्षात पिंक बेरी, गोडी वाढत नाही, रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो. या समस्या दिसून येतात. त्यासाठी आपण जमिनीचे आरोग्य नीट ठेवले तर द्राक्षाचे उत्पादन दर्जेदार मिळेल. जमिनीत जिवाणू असतात. हेच जिवाणू जमिनीतील सेंद्रिय पदार्थावर जगतात. जमिनीची सुपीकता वाढविण्याचे काम जिवाणू करतात. जिवाणू वाढविण्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर केला पाहिजे. त्याकडे लक्ष दिले पाहिजे.

तसेच जमिनीचा सामू महत्त्वाचा आहे. जमिनीचा सामू साडेआठच्या आत पाहिजे. यासाठी पाण्याचा निचरा झाला पाहिजे. पाणी साचून राहिले, तर मुळ्यांची कार्यक्षमता कमी होते. जोपर्यंत शेतीत अचूक विज्ञानाचा वापर होत नाही, तोपर्यंत चांगली शेती पिकणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी विज्ञानाचा वापर केला पाहिजे, असे श्री. म्हात्रे म्हणाले.

पुढे ते म्हणाले, ''शेतीचा अभ्यास करण्यासाठी शेतीतीच्या तंत्रज्ञानाच्या पुस्तकांचा वाचन केले पाहिजे. तणनाशकाचा वापर केल्यास मोठ्या प्रमाणात जमीन नापीक होण्यास सुरू होते. त्यासाठी एकात्मिक तण व्यवस्थापन केले पाहिजे. तण कापून शेतात ठेवा. रासायनिक खतातील प्रत्येक घटकांचा अभ्यास केला पाहिजे. यामुळे जमिनीत कोणते घटक देणे शक्य आहे. जगात द्राक्षासाठी अनेक संशोधन झाले आहे. याचा द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी अभ्यास केला पाहिजे.



**सांगली येथे अॅग्रोवन प्रदर्शनाच्या अंतिम दिवशी 'द्राक्षबागेसाठी जमिनीचे व्यवस्थान' याविषयी मार्गदर्शन करताना द्राक्षतज्ज्ञ एन. बी. म्हेत्रे.**

### द्राक्षाचे होणार ड्रोन सर्वेक्षण

**भविष्यात द्राक्षपिकाचे ड्रोन सर्व्हेक्षण केले जाणार आहे. या माध्यमातून जमिनीचे मातीपरीक्षण, द्राक्षाच्या पान देठ याचा पृथक्करण अहवाल शेतकऱ्याला मिळणार आहे. यामुळे द्राक्षपीक चांगले उत्पादन होण्यास मदत होईल.**

### ठळक मुद्दे

- **भविष्यात पाणी, खतांचे अचूक व्यवस्थापन करावे लागेल**
- **द्राक्षाच्या मुळ्या चांगल्या असतील तर त्याची वाढ चांगली होईल**
- **जमिनीची सुपीकता टिकवली पाहिजे**
- **जमीन, पाणी, पान देठ पृथक्करण केले पाहिजे**
- **जमिनीतील जिवाणू वाढविले पाहिजे**
- **जमिनी चांगली असेल तरच चांगली द्राक्षे**

# गाई, म्हशीच्या आनुवंशिकतेवर दुधाची उत्पादकता अवलंबून : डॉ. गुप्ता

**सांगली (प्रतिनिधी) :** गाई व म्हशीच्या आनुवंशितकतेवर त्यांच्या दुधाची उत्पादकता अवलंबून असते. देशात दूध उत्पादक जनावरांची संख्या जास्त आहे; पण प्रति जनावर दूध उत्पादनाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. यामध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे, असे मत चितळे जिनस एबीएस इंडियाचे सरव्यवस्थापक डॉ. राहुल गुप्ता यांनी व्यक्त केले.

दुधाळ जनावरांच्या प्रजाती व आदर्श गोठा व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी एम्बी इंडस्ट्रीज मुंबईचे व्यवस्थापक सेल्स राकेश काटकर यांनी डॉ. राहुल गुप्ता यांचे स्वागत केले.

डॉ. राहुल गुप्ता म्हणाले ''गाई व म्हशीची निवड करताना ज्याची आनुवंशिकता सर्वोत्तम आहे, अशाच जनावरांची निवड केली पाहिजे. आपण दुग्धव्यवसाय सुरू करताना नेहमी ५ ते १० गाई गोठ्यात बांधतो, पण गोठ्यामध्ये उष्णता अधिक असते. याचा परिणाम दूध उत्पादन घटीवर होतो. गोठ्यातील उष्णता कमी करण्यासाठी गोठ्यांची उंची वाढविणे व हवा खेळती असावी यामुळे दूध उत्पादनात वाढ होण्यास मदत होते. आपल्या हवामानास अनुकूल अशा होस्टन फ्रिजियन (एचएफ), जर्सी, गीर, सहिवाल, रेड सिंधी या जातींच्या गाई अधिक दूध देणाऱ्या आहेत. यामुळे याच जातीच्या गाई संगोपनासाठी योग्य आहेत.''



**सांगली : अॅग्रोवन प्रदर्शनाच्या शेवटच्या व्याख्यानात दुधाळ जनावरांच्या प्रजाती व आदर्श गोठा व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करताना चितळे जिनस एबीएस इंडियाचे सरव्यवस्थापक डॉ. राहुल गुप्ता.**

### ठळक मुद्दे

- **ऑक्टोबर ते मार्च या महिन्यांत गर्भधारणा होण्याचे प्रमाण अधिक आहे. ही बाब चांगली आहे.**
- **ऑक्टोबर ते मार्च याच महिन्यांत चांगल्या चाऱ्याची उपलब्धता असते.**
- **देशी गाईच्या दुधात वाढ शक्य, त्यासाठी आपण सुधारणा करण्याची गरज आहे.**

पुढे ते म्हणाले, ''आपल्या भारतात ३४२ दशलक्ष गाई आहेत. त्यांमध्ये अधिक तर नर जन्मण्याचे प्रमाण ५०: ५० टक्के आहे. पण आपल्याकडे अधिक दुधक्रांती होण्यासाठी मादीची पैदास होणे आवश्यक आहे.''